# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**जावक क्रमांक :- २०४** **दिनांक :- २९/०७/२०२१**

## ऑनलाईनच्या माध्यमातुन वेश्याव्यवसाय करणाऱ्या वेश्यादलालवर कारवाई करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना यश

दिनांक २७.०७.२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांना त्यांच्या विश्वसनीय खबऱ्याकडुन माहिती प्राप्त झाली की, इसम नामे अरविंद हा अंधेरी पुर्व परिसरात रहात असून ऑनलाईन जाहिरातीद्वारे व मोबाईल क्रमांकावर गिऱ्हाईकांशी संपर्क साधून तो वेश्याव्यवसायासाठी वसई व मिरा भाईन्दर परिसरातील लॉजमध्ये रुम बुक करुन किंवा गिऱ्हाईकास लॉजमध्ये रुम बुक करावयास लावून किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार वेश्यागमनाचा मोबदला घेवून गिऱ्हाईकास मुली पुरवितो. सदर बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस. एस. पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना मिरा-भाईंदर रोडवरील लॉजवर, मिरारोड पुर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक २७/७/२०२१ रोजी १७.१० वा. छापा टाकला असता वेश्यादलाल राजेश परमेश्वर चौरसिया, वय ३८ वर्ष रा. नित्यानंद चाळ, बाफाने फाटा, नायगाव पुर्व, ता.वसई जि.पालघर, मुळ रा. ग्राम- बभनी पांडे, पो. ठाणे-खुकुंद, ता. सलेमपुर, जि. देवरीया, राज्य-उत्तरप्रदेश हा त्याचे ॲटो रिक्षा क्र. MH.47.X.0806 मधुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष ग्राहाकांना मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ पिडित महिलेची सुटका करण्यात आली. सदर बाबत पोशि/३६६० केशव एन. शिंदे यांचे फिर्यादीवरुन आरोपी राजेश चौरसिया व त्याचे साथीदार पाहिजे आरोपी अरविंद रा. साकीनाका, अंधेरी पुर्व व संजय उर्फ विजय यादव, रा. दहिसर पुर्व यांच्या विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I २५४/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाहिजे आरोपी संजय उर्फ विजय यादव व त्याचे इतर साथीदार यांच्या विरुध्द (कांदीवली पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र.८६८/२०२०) गु.प्र.शा.गु.अ.वि. मुंबई गुन्हा नोंद क्र. १४७/२०२०, भादंविस कलम ३७०(३), ३४ सह पिटा ॲक्ट ४, ५, ६ अन्वये दाखल असुन सदर गुन्हात पाहिजे आरोपी आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे, पोहवा.१६३ रामचंद्र पाटील, पोशि.३६६० केशव शिंदे, मपोना/१७८९ वैष्णवी यंबर यांनी केली आहे.

-----oooo----